नाशिक जिल्हा परिषद,नाशिक
(ग्रामपंचायत विभाग)
Email : vptzpnsk@rediffmail.com
दुरध्वनी क्र ०२५३/२५००५१४ फॅक्स क्र ०२५३/२५०८३८९

---

जा.क्र. नाजिप/जिप्रव्यक/रागांपंसअ/ ३३८/२०१७
नाशिक दिनांक :- १८ / ११ / २०१७

# जाहिर नोटीस

## अभ्यास दौऱ्यासाठी कोटेशन / दरपत्रक मिळणेबाबत.

**विषय :-** **जिल्हा परिषदेच्या अभ्यास दौऱ्यासाठी लक्झरी बसचे कोटेशन/दरपत्रक सादर करणेबाबत.**
(वाहन + निवास + भोजन इ. सुविधेसह)

**संदर्भ :-** १) मा. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. रागांपं-२०१७/प्र.क्र.११०/योजना-४ दिनांक १२ मे २०१७
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यता क्र. नाजिप/जिप्रव्यक/ रागांपंसअ/१७५/२०१७ दिनांक १५/०६/२०१७
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मंजूर टिपणी. दिनांक १८/१०/२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०१७-१८ अंतर्गत जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत लोकप्रतिनिधी / अधिकारी / कर्मचारी (एकुण ४० प्रतिनिधींकरिता) कोकण विभाग रायगड जिल्हयातील १) सुधागडपाली २) आंबेपूर ३) साळाव ४) रोहा बुद्रुक ५) चांदोरे ६) दिवेआगर तसेच रत्नागिरी जिल्हयातील ७) खर्डी ८) गणपतीपुळे या उत्कृष्ट व नाविन्यपुर्ण कामकाज केलेल्या ग्रामपंचायतींचा अभ्यास करणेकामी ४ दिवसीय (३ रात्री, ४ दिवस) अभ्यास दौऱ्याचे आयोजन करावयाचे आहे.

सदर अभ्यास दौऱ्याकरिता मान्यताकृत ट्रॅव्हल्स / यात्रा कंपनींकडून ४० व्यक्तिंसाठी लक्झरी बसचे (वाहन + निवास + भोजन इ. सुविधेसह) कोटेशन / दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**<u>कोटेशन / दरपत्रक सादर करणेबाबत सुचना खालीलप्रमाणे.</u>**

१) ट्रॅव्हल्स कंपनी मान्यताकृत असावी.
२) उक्त अभ्यास दौरा अंदाजित १५०० ते १७०० कि.मी. चा असेल त्यानुसार कोटेशन सादर करावे.
३) अभ्यास दौऱ्यात ४० जि.प. लोकप्रतिनिधी / अधिकारी / कर्मचारी + ४ सहाय्यक कर्मचारी = एकुण ४४ प्रतिनिधींचा समावेश राहणार आहे.
४) कोटेशन वातानुकुलित वाहन + नॉन एसी निवास + १ वेळ नाश्ता, २ वेळ चहा, २ वेळ भोजन याप्रकारे सादर करण्यात यावे. ( निवास : एका रुममध्ये २ व्यक्ति व भोजन दर्जा उच्च प्रतीचा असावा.)
५) कोटेशन / दरपत्रक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद नाशिक यांचे नावे ग्रामपंचायत विभागात समक्ष अथवा पोष्टाने नोटीस प्रसिध्द झालेपासुन ८ दिवसांत सादर करावे, मुदतीत प्राप्त न झालेले अथवा इतर कुठल्याही कारणाने विलंबाने प्राप्त झालेल्या कोटेशन / दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
६) प्राप्त कोटेशन पैकी ज्या ट्रॅव्हल्स कंपनीचे कोटेशन अभ्यास दौऱ्यासाठी अंतिम केले जाईल, त्या ट्रॅव्हल्स / यात्रा कंपनीने करार करतेवेळी मान्यता / परवाना, अनुभव व अनुषंगिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
७) अभ्यास दौऱ्यामध्ये टोल, पार्कींग, पोलिस एन्ट्री व इतर तत्सम चार्जेस यात्रा कंपनीने अदा करावयाचे आहे.
८) सदर अभ्यास दौरा नैसर्गिक कारणास्तव वा इतर कारणास्तव कोकण विभागाव्यतिरिक्त इतरत्र आयोजित करण्याचा, अंशतः बदल करण्याचा किंवा पूर्णतः अभ्यास दौरा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

(राजेंद्र पाटील)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)**
**जिल्हा परिषद नाशिक**